# भूमिगत प्रवास दृष्टिपथात

## मेट्रो ३च्या पहिल्या टप्प्याचे ९२ टक्के काम पूर्ण

नितीन बिनेकर, मुंबई

**मुंबईकरांचा भूमिगत प्रवास दृष्टिपथात आला आहे. मेट्रो ३ ॲक्वा लाईनच्या आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे ९२ टक्के काम पूर्ण झाले आहे; तर एमआयडीसी स्थानकाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे.**

प्रवासाचा वेळ वाचवत वेगात आणि सुलभ प्रवासाच्या उद्देशाने मेट्रो ३ची आखणी केली आहे. ही मुंबईतील पहिली आणि एकमेव पूर्णपणे भूमिगत मेट्रो मार्गिका आहे. यातील २७ पैकी २६ स्थानके भूमिगत आहेत. ३० सप्टेंबरपर्यंत पहिल्या टप्प्यातील आरे ते बीकेसी या एकूण प्रकल्पाची ९२.१ टक्के प्रगती पूर्ण झाली आहे. यामुळे लवकरच मुंबईकरांना भूमिगत प्रवास करण्याची संधी मिळणार आहे. तसेच रोजच्या वाहतूक कोंडीतूनही सुटका होणार आहे. एमआयडीसी मेट्रो स्थानकाप्रमाणे इतर स्थानकांची कामेही वेगाने पूर्ण होतील, अशी आशा सध्या व्यक्त केली जात आहे.



**मुंबई :** अंधेरी येथील एमआयडीसी मेट्रो स्थानकाचे काम पूर्णत्त्वाकडे आले आहे.

## एमआयडीसी स्थानक ९५ टक्के पूर्ण

१ एमआयडीसी मेट्रो स्थानक हे पायलिंग प्रक्रिया, छप्पर स्लॅब, कॉन्कोर्स स्लॅब आणि बेस स्लॅब पूर्ण करणारे पहिले स्टेशन आहे. या स्टेशनवर चार प्रवेश/निर्गमन, नऊ एस्केलेटर आणि ५ लिफ्ट असतील.

२ एमआयडीसी मेट्रो स्थानकाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

३ अंधेरी हे मुंबईतील एक प्रमुख व्यावसायिक इमारतींचे आणि ऑफिसच्या उंच इमारती असणारे ठिकाण आहे. हे स्टेशन मरोळ औद्योगिक वसाहत, चकाला औद्योगिक वसाहत, कोंडीविटा या भागातील नागरिकांना सोयीचे असेल.

४ ईएसआयसी उप-प्रादेशिक कार्यालय, पासपोर्ट सेवा केंद्र अंधेरी, सेव्हन हिल्स हॉस्पिटल, ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स, आकृती ट्रेड सेंटर यांसारख्या महत्त्वाच्या संस्थांमध्ये ये-जा करणाऱ्या मुंबईकरांना सुविधा पुरवेल.

## असे आहे स्थानक

एमआयडीसी मेट्रो स्थानकाची जमिनीपासून खोली २१.५ मी., रुंदी २४.५ मी.; तर स्थानकाची एकूण लांबी अंदाजे २४० मीटर आहे. पॅकेज-७ मध्ये सिप्झ आणि मरोळ नाका यांचा समावेश आहे. एमआयडीसी मेट्रो स्थानकाचे ९८.८ टक्के सिव्हिल आणि ९०.६ टक्के सिस्टीम वर्क पूर्ण झाले आहे. दरम्यान या मार्गिकांवर आता मेट्रोच्या ट्रायल रनदेखील सुरू झाल्या असून लवकरच मेट्रो ३ मुंबईकरांच्या सेवेत हजर होईल.